पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ११८

सभावृत्तांत

दिनांक - १०/०६/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १०/०६/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब
३. मा. लोंढे गणेश नारायण
४. मा. कदम सदगुरु महादेव
५. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा. शेंडगे आशा सुखदेव
७. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
८. मा. तरस बाळासाहेब जयवंत
९. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
१०. मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

याशिवाय मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा,ढेरे, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.घाडगे - मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे – प्र.शहर अभियता, मा.सुरगुडे- विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.पवन सावळे - अति.वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक, नगररचना, मा.निकम, मा.इंगळे, मा.काची, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.थोरात, मा.कुलकर्णी, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कन्हेरे – कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक) मा.साळुंके – उद्यान अधिक्षक, मा.गोरे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार , मा.बोदडे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.११ - सन २०१४-१५ करिता इ.५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना मोफत बसपास योजना राबविणेस व अगाऊ रक्कम अदा करणेबाबत....

विषय क्र.१२ - निराधारनगर पिंपरी येथील आगीच्या दुर्घटने मध्ये बाधित कुटुंबांना पुरविणेत आलेल्या भोजनाचे बील अदा करणेबाबत.....

विषय क्र.१३ - आषाढीवारी पालखी सोहळा वारक-यांना मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा पुरविणेबाबत....

विषय क्र.१४ - उद्यान देखभाल संरक्षणाकामी देणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१५ - राष्ट्रीय कार्यक्रमाकरिता स्टिकर्स, वॉटरप्रुफ बोर्ड तयार करुन घेणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१६ - किवळे प्रभाग क्र.१८ मधील विकासकामाचे अंतर्गत तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१७ - तरतूद वर्ग करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१८ - तरतूद वर्ग करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१९ - तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२० - मानधनावर काम करणा-या परिचारीकांना कायम स्वरुपी कामावर घेणेबाबत - मा.बाळासाहेब तरस, मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१ - तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२ - तरतूद वर्ग करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२३ - अंदाजपत्रकीय तरतदू वर्ग करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४ - अंदाजपत्रकीय तरतदू वर्ग करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.रमा ओव्हाळ अनुमोदक : मा.अतुल शितोळे

गुरुवार दिनांक १२/०६/२०१४ दुपारी २.१५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती** - गुरुवार दिनांक १२/०६/२०१४ दुपारी २.१५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ११८

सभावृत्तांत

( दिनांक १०/०६/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - १२/०६/२०१४ वेळ - दुपारी २.१५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक १०/०६/२०१४ ची तहकूब सभा गुरुवार, दिनांक १२/०६/२०१४ रोजी दुपारी २.१५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. शेंडगे आशा सुखदेव
३. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
४. मा. गायकवाड संध्या सुरदास
५. मा. तरस बाळासाहेब जयवंत
६. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
७. मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

याशिवाय मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा,ढेरे, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियता, मा.सुरगुडे- विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.भोसले – मुख्य लेखापाल, मा.डॉ.अनिल रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.मनोज देशमुख - वैद्यकीय अधिक्षक, मा.निकम, मा.इंगळे, मा.काची, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.थोरात, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कन्हेरे – कार्यकारी अभियंता, मा.साळुंके – उद्यान अधिक्षक, मा.गोरे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार , मा.बोदडे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

ठराव क्रमांक – ७००५ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/६/कावि/१३२/२०१४, दि.२३/०५/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने माहे मार्च २०१४ ते एप्रिल २०१४ या कालावधीत क्षेत्रीय कार्यालय ब,क,ड, ई व फ ची स्वच्छता मोहिम तसेच हॉटेल सतीष एक्झिक्युटिव्ह, थेरगांव येथील अतिक्रमण कारवाई, मा.प्रभाग समिती सभापती यांची निवड इ.कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटिंग मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, सांगवी पुणे २७ यांच्याकडून (मे.रामा व्हिजन, थेरगांव यांच्याकडील जुन्या

दराने) करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरीता र.रु. १८,०००/- (अक्षरी र.रु. अठरा हजार फक्त) खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७००६ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - पशुवैद्यकीय विभाग

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/२/कावि/२७०/२०१४, दि.३१/०५/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पशुवैद्यकीय विभागांतर्गत शहरातील मोकाट कुत्र्यांची गणना करणेकरीता मे.वर्ल्ड वाईड वेटरनरी सर्व्हिसेस यांची नेमणुक करुन त्यांना त्या कामी अदा करावयाची र.रु.१,१०,७००/- (अक्षरी र.रू. एक लाख दहा हजार सातशे) रक्कम अदा करणेस तसेच कुत्री पकडण्याचे कामी व्याप्ती विचारात घेता अन्य संस्था सदरचे दराने रात्रीचे वेळेसही कुत्री पकडण्याचे काम करण्यास तयार असल्यास त्या संस्थांस एक वर्ष कालावधी करिता काम देण्यास व त्याकामी येणारे प्रत्याक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७००७ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - दुरसंचार

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.दुरसंचार/२/कावि/१३५/२०१४, दि.३१/०५/२०१४

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका दुरसंचार विभागामार्फत कार्यालयीन कामकाजात गतिमानता येणेसाठी मा.पदाधिकारी, नगरसदस्य, अधिकारी , कर्मचारी व कार्यालये यांस मे.आयडीया कंपनीची मोबाईल सीम सुविधा पुरविलेली आहे. कार्यालयीन कामकाजासाठी खालील अधिकारी/कर्मचारी यांस मोबाईल सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने मोबाईल वापराची प्रतिमाह अधिकतम वापर मर्यादा त्याच्या पदासमोर नमुद केल्याप्रमाणे निश्चित करुन मोबाईल सीम सुविधा पुरविणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | पदनाम | संख्या | वापर मर्यादा र.रु. |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता | ९ | ३००/- |
| २ | डॉक्टर | १ | ३००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७००८ विषय क्रमांक – ०४
दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - प्रशासन
सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.अतुल शितोळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/५/कावि/४०७/२०१४, दि.०२/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

रखवालदार पदासाठी घेणेत येणा-या लेखी स्पर्धा परीक्षेकरिता मे.झील टेक सर्व्हिसेस, कोथरुड, पुणे. यांचेकडून ओएमआर उत्तरपत्रिका छपाई करुन घेणे तसेच मशीनवर उत्तरपत्रिका तपसणीचे काम थेट पध्दतीने करुन घेणेस व त्याकरीता येणा-या अंदाजे र.रु.३३,०५८/- अथवा प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७००९ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - विद्युत मुख्य
सुचक – मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.विकास अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विसुका/५/कावि/२०१/२०१४, दि.३१/०५/२०१४

मा.विकास अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.९/२०१३-२०१४ मधील अ.क्र.३७ अन्वये, प्र.क्र.२३, २४ व २५ मधील सो.व्हे. दिव्यांची नादुरुस्त केबल जंक्सन बॉक्स यांची दुरुस्ती करणेकामी. मे.अबान इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.११,२४,९६६/- [अक्षरी र.रू. अकरा लाख चोवीस हजार नऊशे सहासष्ठ] पेक्षा ३९.७७० % कमी ) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१० विषय क्रमांक – ०६
दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - विद्युत मुख्य
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/२०३/२०१४, दि.३१/०५/२०१४

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.९/२०१३-२०१४ मधील अ.क्र.५१ अन्वये, ब प्रभागातील मनपा भवन उपविभागातील विविध इमारती मधील सी.सी टी.व्ही कॅमेरेची देखभाल दुरूस्ती करणेकामी मे.पी.एम.के.इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू. ४,२८,७४६/- (अक्षरी र.रू.चार लाख अठ्ठावीस हजार सातशे शेचाळीस) पेक्षा २१.२१ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामाकरून कामाचा आदेश देणेत आला असल्याचे त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०११ | विषय क्रमांक – ०७
दिनांक – १२/०६/२०१४ | विभाग - विद्युत मुख्य
सुचक – मा.अतुल शितोळे | अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.विकास अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/२०२/२०१४, दि.३१/०५/२०१४

मा.विकास अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.१२/२०१३-१४ मधील अ.क्र.७ अन्वये, तालेरा व जिजामाता रूग्णालयामध्ये अग्निशामक यंत्रणा बसविणे कामी मे.अथर्व इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस (नि.र.रू.१०,५६,०३७/- [अक्षरी र.रू.दहा लाख छप्पन्न हजार सदोतीस] पेक्षा १७.०१ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१२ | विषय क्रमांक – ०८
दिनांक – १२/०६/२०१४ | विभाग - क क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.विनय गायकवाड | अनुमोदक – मा.अतुल शितोळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जा.क्र./क/स्था/५६३/२०१४, दि.२८/०५/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सांगवी प्रभाग क्र ६० मधील संगमनगर परिसरामध्ये मॉडेल वॉर्ड पध्दतीने एकत्रीत काम करण्याचे नियोजित असून विषयांकीत कामाकरीता चालू सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात १ कोटी इतकी तरतूद असून कामाची निकड लक्षात घेता प्रस्तावा सोबत जोडलेल्या तक्त्यामधील कामावर होणारा संभाव्य खर्च विचारात घेता एकूण १४ इतक्या कामावरून र.रू.१,२६,००,०००/- इतकी तरतूद या कामावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१३ | विषय क्रमांक – ०९
दिनांक – १२/०६/२०१४ | विभाग - ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.संध्या गायकवाड | अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बक्षे/थेर/कावि/५१/२०१४, दि.०३/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

थेरगाव प्रभाग क्र.४९, स.नं.९ मध्ये नियोजित रूग्णालय बांधणे या कामाकरिता यापुर्वी झालेला ठराव क्र.५११० दि.३/१२/१३ रद्द करून या कामाकरीता वास्तुविशारद मे.शशी प्रभु अँण्ड असोशिएट यांचा या प्रकाराचा अनुभव व केलेली कामे पहाता सदर प्रकल्पाच्या नियोजनासाठी संकल्पचित्र, आराखडे, बांधकाम परवानगी, पुर्वगणपत्रक व निविदा इ.कामाकरिता निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करण्यासाठी वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१४ विषय क्रमांक – १०

दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - स्थापत्य मुख्य

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/श.अ./तां/४/१३०/२०१४, दि.१९/०५/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडील २ मार्च २००९ च्या शासन निर्णय व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या दि.०५/०५/२०१४ रोजीच्या निर्देशांचे तपशीलवार विवेचन व अवलोकन करता अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण निर्मुलनासाठी नव्याने समर्पित यंत्रणा निर्माण करणेसाठी **त्याबाबतचा प्रस्ताव मनपाने तयार करून त्यास सक्षम समितीची मान्यता घेणेची कार्यवाही पूर्ण करून त्यांचेकडील प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी शासनास आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे** व त्याबाबतचा पूर्तता अहवाल प्रतिज्ञापत्र स्वरूपात मा.उच्च न्यायालयास दि.४ जुलै २०१४ रोजी सादर करावयाचा आहे. **मा.उच्चन्यायालयाने निर्देश दिल्यानुसार विहीत मुदतीत म्हणजेच ३० जून २०१४ पर्यंत सदर बाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर न केल्यास मा.उच्चन्यायालयाच्या आदेशाचा अवमान होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने** त्यानुसार **समर्पित, सक्षम यंत्रणेसाठी नव्याने पदे निर्माण करणे** व त्याअनुषंगाने येणा-या वार्षीक संभाव्य खर्चास (प्रस्तावा सोबतच्या परिशिष्ट क व इ मध्ये नमूद केले प्रमाणे) मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७०१५ विषय क्रमांक – ११

दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - माध्यमिक शिक्षण

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/१०७/२०१४, दि.०९/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मनपाच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांतील तसेच खाजगी मान्यताप्राप्त शाळांमधील इ.५ वी ते १० वी चे विद्यार्थी / विद्यार्थिनीस मोफत बसपास देणेची योजना पुणे महानगरपरिवहन महामंडळ प्रा.लि. पुणे यांचेमार्फत राबविणेस व तसेच मोफत बसपास योजना राबविणेस येणा-या अंदाजे र.रु.११ कोटी किंवा प्रत्यक्षात येणा-या खर्चास मान्यता मिळावी. तसेच सन २०१३-१४ मधील मोफत बसपास योजना उपक्रमासाठी झालेल्या एकूण रक्कम रुपये ९,२०,६७,१५५/- चे ५०% रक्कम ४,६०,३३,५७८/- म्हणजेच पुर्णांकित र.रु.४,६०,००,०००/- पीएमपीएमएल यांना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षातील मोफत बसपास योजने अंतर्गत विविध उपक्रम या लेखाशिर्षातून अगाऊ अदा करणेस व सदरची योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१६ विषय क्रमांक – १२

दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - ब प्रभाग

सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बप्र/१/कावि/२९४/२०१४, दि.१०/०३/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग कार्यक्षेत्रामध्ये निराधारनगर पिंपरी येथे दि.०७/०१/२०१४ रोजी दुपारी २.३० च्या सुमारास आग लागून दुर्घटना घडली. सदर घटनेमध्ये झोपडया जळाल्याने एकूण १६ कुटूंबे बाधित झाली आहेत. त्यांना तातडीने मदत म्हणून ब प्रभाग यांनी समाज मंदिरामध्ये तात्पुरती निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था केली होती. दुर्घटनाग्रस्तांसाठी तातडीची भोजन व्यवस्था मा.क्षेत्रीय अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय यांचे सुचनेनुसार मे.सुरुची फास्ट फुड, चिंचवड यांनी दि.०७/०१/२०१४ ते ०९/०१/२०१४ अखेर दुर्घटनाग्रस्त नागरिकांना भोजन पुरविले असून या कामी एकूण र.रु.९,०००/- (अक्षरी र.रु.नऊ हजार फक्त) ची मागणी या कार्यालयाकडे केलेली आहे. ती त्यांना देय आहे. सदरचा खर्च अग्निशमन विभागाकडील आपत्तीग्रस्त सहाय्यता निधी या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१७ विषय क्रमांक – १३

दिनांक – १२/०६/२०१४ विभाग - वैद्यकीय मुख्य

सुचक – मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१/कावि/६५२/२०१४, दि.०९/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दि.२०/०६/२०१४ व २१/०६/२०१४ रोजी जगदगुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी मनपा कार्यक्षेत्रामधील आकुर्डी येथे मुक्कामी असते. सदरवेळी वारक-यांना मनपाचे रुग्णालयामार्फत मोफत वैद्यकीय सेवा व उपचार देण्यात येतात. पुणे जिल्हामध्ये पदवीधर व शिक्षक मतदार संघाची आदर्श आचारसंहिता लागु आहे. तथापि वैद्यकीय सेवा हा विषय अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असलेने व पालखी सोहळयामध्ये सहभागी होणा-या वारक-यांना वैद्यकीय सुविधा मोफत देणे आवश्यक असलेने एक तातडीची व विशेष बाब म्हणुन मान्यता मिळणे आवश्यक आहे. सबब मनपाचे रुग्णालयामार्फत वारक-यांना मोफत वैद्यकीय सेवा सुविधा देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०१८ विषय क्रमांक – १४

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

शाहू उद्यान चिंचवड व देवबाई नारायण कापसे उद्यान हे देखभाल संरक्षणाकामी सध्याचे मंजूर निविदा दराने तीन वर्षे कालावधीसाठी अनुक्रमे बिजलीनगर युवा प्रतिष्ठान व मे.भगवती स्वयंरोजगार सेवा सह.संस्थेस देणेस व त्याकामी करारनामा करुन येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७०१९ विषय क्रमांक – १५

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

सामाजिक कार्यक्रमाकरीता पर्यावरण, आरोग्य विभाग व वैद्यकीय विभागामार्फत राबविणेत येणा-या राष्ट्रीय कार्यक्रमाकरीता उदा. एड्स, शालेय आरोग्य तपासणी, क्षयरोग, पल्स पोलिओलसीकरण, कुष्ठरोग, मलेरिया, हिवताप, डेंग्यू, रेबीज, इ. व इतर सर्व कार्यक्रमांकरीता लागणारे स्टिकर्स व वॉटरप्रुफ बोर्ड हे मंजूर निविदा दरानुसार पुढील तीन वर्ष कालावधीकरीता तयार करुन घेणेस मे.ओम एंटरप्राईजेस यांचे समवेत करारनामा करुन घेणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२० विषय क्रमांक – १६

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

किवळे प्रभाग क्र.१८ मधील विकास कामांचे अंतर्गत प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१५ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२१ विषय क्रमांक – १७

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२२ विषय क्रमांक – १८

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकातील वाहतूक सुधारणा विषयक कामे करणे या उपलेखाशिर्षाखाली प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२३ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२३ विषय क्रमांक – १९

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील "ड" प्रभाग व "ड" मुख्यालयातील कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२४ विषय क्रमांक – २०

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

मनपाच्या रुग्णालयामध्ये व दवाखान्यामध्ये मानधनावर काम करित असलेल्या परिचारीकांना कायमस्वरुपी कामावर घेणेबाबत योग्य ती कार्यवाही करणेतस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२५ विषय क्रमांक – २१

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.२५ येथील कामासाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१८ लाख) सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२६ विषय क्रमांक – २२

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

फ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्यालयामध्ये सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.६३ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२७ विषय क्रमांक – २३

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

मनपाच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१५ लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०२८ विषय क्रमांक – २४

दिनांक – १२/०६/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.बाळासाहेब तरस यांचा प्रस्ताव -

मनपाच्या सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.८० लाख)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/५०७/२०१४
दिनांक - १२/०६/२०१४



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.